# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**नविन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे - ४११०४४**

**Pune Metropolitan Region Development Authority, Pune**

New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune - ४११०४४

Phone no. ०२०-२५९३३३३३ / ४४ / ५६ Email: planning.dept@pmrda.gov.in

---

जा.क्र.पीएमआरडीए/नियोजन विभाग/प्रा.वि.यो./कलम २८(२)/नि.स. / ५५ /२०२२ दिनांक : २४ /०१/२०२२

प्रारूप विकास योजना - पुणे महानगर प्रदेश
विकास प्राधिकरण
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना
अधिनियम, १९६६ चे कलम २८(२) अन्वये
नियोजन समिती गठीत करण्याबाबत.

## आदेश

**वाचा :** १) पुणे महानगर प्रदेशाची प्रारुप विकास योजना प्रसिद्ध झाल्याबाबत दि. ०२/०८/२०२१ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेली सुचना

२) मा. संचालक, नगर रचना यांचे आदेश क्र.प्रावियो/पुमप्रविप्रा/नियोजन समिती/कलम २८(२)/टीपीव्ही-१/५५९४ दि. ०२/१२/२०२१.

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेले)च्या कलम २६(१) मधील तरतदीनुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (यापुढे "उक्त प्राधिकरण" असे निर्देशिलेले) पुणे महानगर प्रदेशाची प्रारूप विकास योजना तयार करून त्यासंबंधीची सूचना उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये दि. ०२/०८/२०२१ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त प्रदेशाच्या प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेसाठी उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) अन्वये गठित करावयाच्या समितीमध्ये, नियोजन प्राधिकरण ठरविल असे सदस्य असतील व संचालक, नगर रचना यांचे मान्येतेने, नगर व प्रदेश रचना किंवा पर्यावरण यांच्याशी किंवा या दोन्हींशी संबंधित असणाऱ्या बाबींचे विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या चार पेक्षा अधिक नसतील इतक्या व्यक्तींचा समावेश असणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी नियोजन समिती मधील तीन सदस्यांच्या नेमणुकीस मान्यता दिलेली असून, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेश क्र.प्रावियो/पु.म.प्र.वि.प्रा./नियोजन समिती/कलम २८(२)/टिपीव्ही-१/५५९४ दि. ०२/१२/२०२१ अन्वये समितीवर नियोजन समिती मधील ४ तज्ञ व्यक्तींची नियुक्ती केलेली आहे.;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये पुणे महानगर प्रदेशाच्या प्रसिद्ध प्रारुप विकास योजनेसाठी खालील प्रमाणे नियोजन समिती गठीत करण्यात येत आहे.

अ) **अशासकिय सदस्य**

१) मा.श्री. तानाजी सावंत, विधानसभा सदस्य.
२) मा.श्री. अजित बाळकृष्णआपटे, पुणे
३) मा. डॉ. राजेंद्र जगदाळे, सायन्स अँण्ड टेक्नॉलॉजी पार्क.

**ब) तज्ञ सदस्य**

४) श्री. रमानाथ झा, अध्यक्ष, वारसा जतन समिती, मुंबई व निवृत्तप्रधान सचिव, परिवहन,बंदरे वराज्य उत्पादन शुल्क विभाग, महाराष्ट्र शासन.
५) श्री. राजेंद्र रा. पवार, निवृत्त सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन.
६) श्री.सुधाकर बा. नांगनुरे, निवृत्त संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य.
७) श्री.डॉ. राहूल सुभाष कराळे, प्रमुख, स्थापत्य, अभियांत्रिकी विभाग, भिवराबाई सावंत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे.

28/1/22

**(डॉ. सुहास दिवसे)**
महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**प्रत :**

१) मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि-१), मंत्रालय, मुंबई.
२) मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. सर्व नियोजन समिती सदस्य.
४) सहसंचालक, नगर रचना तथा नगर रचना अधिकारी, प्रारूप विकास योजना, पुणे महानगर प्रदेश.